बुधवार,
९ जानेवारी २०१९ ४

सकाळ

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

# सामूहिक लोकनृत्य प्रकारात दहिवडी कॉलेज प्रथम

## पुसेगाव यात्रेतील जिल्हास्तरीय युवा महोत्सवात ३० महाविद्यालयांचा सहभाग

**पुसेगाव, ता. ८ :** श्री सेवागिरी महाराजांच्या यात्रेनिमित्त येथे श्री सेवागिरी देवस्थान ट्रस्टतर्फे आयोजित जिल्हास्तरीय युवा महोत्सवात सामूहिक लोकनृत्य प्रकारात दहिवडी कॉलेज दहिवडी, रेकॉर्ड डान्स प्रकारात डी. पी. भोसले कॉलेज कोरेगाव, पथनाट्य प्रकारात विलास झोले-पाटील युवा मंच बेळगाव, समूहगीत प्रकारात कला व वाणिज्य महाविद्यालय पुसेगाव, तर सुगम गायन प्रकारात युवा कलारंग येणपे (ता. कऱ्हाड) सर्वोत्कृष्ट ठरले.



**पुसेगाव : युवा महोत्सवात सादर करण्यात आलेल्या समूह नृत्याचे दृश्य.**

मनोरंजनातून व प्रबोधनातून समाजाचे अंगण फुलवणाऱ्या या युवा महोत्सवाला रसिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. या युवा महोत्सवात जिल्ह्यातील ३० महाविद्यालयांनी सहभाग घेतला. महोत्सवामध्ये सातारा येथील चिमुकली अंध कलाकार पियुषा सुनील भोसले हिने सादर केलेल्या संभाजी महाराजांच्या पोवाड्याने रसिकांच्या अंगावर रोमांच उभे राहिले. तर, अपंग कलाकार संभाजी यादव यांच्या हास्यदरबारने हास्याचे फवारे उडविले.

सुगम गायन प्रकारातील विजेते संघ पुढीलप्रमाणे : प्रथम-युवा कलारंग येणपे, ता. कऱ्हाड, द्वितीय - कला व वाणिज्य महाविद्यालय पुसेगाव, तृतीय-दहिवडी कॉलेज दहिवडी, लोकनृत्य प्रकारातील विजेते : प्रथम-दहिवडी कॉलेज दहिवडी. समूह गीत प्रकारातील विजेते : प्रथम-कला व वाणिज्य महाविद्यालय पुसेगाव, द्वितीय- डी. पी. भोसले कॉलेज कोरेगाव, तृतीय- मुधोजी कॉलेज फलटण, उत्तेजनार्थ- युवा कलारंग येणपे व हनुमानगिरी ज्युनिअर कॉलेज पुसेगाव, पथनाट्य प्रकारातील विजेते : प्रथम- विलास झोले-पाटील युवा मंच बेळगाव, द्वितीय-अरविंद गवळी इंजिनिअरिंग कॉलेज सातारा, तृतीय- डी. पी. भोसले कॉलेज कोरेगाव, उत्तेजनार्थ- प्रबोधन पर्व- एक सूरताल ग्रुप सातारा.

डॉ. युनूस शेख, डॉ. संजय सरगडे, प्रा. मोकाशी, प्रा. हिरोजी देशमुख, प्रा. एम. एस. मुजावर, अशोक चव्हाण, सोनटक्के यांनी या स्पर्धांचे परीक्षण केले. मठाधिपती सुंदरगिरी महाराज, सेवागिरी देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. सुरेश जाधव, विश्वस्त मोहनराव जाधव, रणधीर जाधव, योगेश देशमुख, प्रताप जाधव, सुरेशशेठ जाधव, प्राचार्य डॉ. संजय कांबळे, प्राचार्य डी. पी. शिंदे, मुख्याध्यापक संध्या चौगुले, प्रा. संजय क्षीरसागर यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली.